काव्यान्तर

अनुवाद

**भारती**
**गोरे**

# मदन कश्यप

**कवितासंग्रह**

- लेकिन उदास है पृथ्वी
- निम रोशनी में
- कुरुज
- गूलर के फूल नहीं खिलते
- कवि ने कहा (चुनी हुई कविताएँ)



## झुरळं

उजेड मावळताच
काळोखाच्या छातीवर सरपटायला लागतात
झुरळं
इतकी घाणेरडी आणि किळसवाणी
की किळसेपोटी यांना मारावंसं सुद्धा वाटत नाही
इतके कोडगे
की पायाने रागडलं तरी मरत नाहीत
एवढा घाण वास यांचा
की किडे खाणारे जीव जंतुही यांना गिळू शकत नाहीत

कोठेही राहू शकतात
झुरळं
सहाराच्या उष्ण तापत्या वाळवंटात
सायबेरियाच्या बर्फाळ हवेत
कुठेही राहू शकतात
झुरळं
काहीही खाऊ शकतात
अन्न-कण
साबण मेण लाकडाचा भुगा
काहीही
अगदी काही मिळाले नाही
तर स्वतःची गळून पडलेली कातडीही
आपली अंडी सुद्धा
काहीही
अगदी काहीही

यांचे एरियलवजा कान ऐकतात
यांच्या उंचीहून अधिक
आणि आवश्यकतेपेक्षा अधिक पाहतात
यांचे पाच पाच डोळे
आपल्या सवयीनुसार जग शोधत नाहीत हे
उलट जगानुसार बदलून घेतात
आपल्या सवयी

डायनोसॉरच्या पूर्वी
जमीनी वर सरपटायची झुरळं
दरम्यान
माणसाचं राज्य येण्यापूर्वी
किती तरी जीवांनी राज्य केलं या पृथ्वीवर
कितीक प्रजाति नष्ट झाल्या
पण प्रत्येक शासनकाळात
दमट अंधारलेले कोपरे शोधून
वाढत राहिली
झुरळं

उजेडाचं फार वावडं यांना
जणू उजेड म्हणजे फरमान यांच्या मृत्युचं
काळोख दमटपणा आणि घाणीवर
बेहद्द प्रेम यांचं
इथेच आपला वंश वाढवतात
झुरळं

काळोखातून काळोखाकडे धावत
वीस कोटी वर्षांपासून
वसली आहेत या पृथ्वीवर
साडे तीन हजाराहून अधिक उपजाती असणारी
झुरळं

यांचं असणं म्हणजे पुरावा या गोष्टीचा
की या पृथ्वीच्या कैक कोपऱ्यांमध्ये
अजूनही पोचला नाहीये उजेड

## या गप्प बसण्याचं काय करायचं?

किंकाळी आणि गोंधळाचे अर्थ काढले जाऊ शकतात
पण या शांत-गप्प बसण्याचं काय करायचं
पापण्या लववून खाल मानेने अशी उभी आहे
ही शांतता
की ती चेहराही वाचू देत नाहीये

अर्थ खंगलेल्या शब्दांच्या या जगात
हे सहज शक्य आहे की
या गप्प बसण्यावर
आपणही मूग गिळून गप्प रहावं
मग इकडे लक्ष न देता
खूप आरडाओरडा करावा
कविता लिहाव्यात
गप्प बसण्याकडे दुर्लक्ष करून

हजारो विषय आहेत हो कवितेसाठी
मग या गप्प बसण्यावरून
डोक्याला का एवढा ताण द्यायचा

केवळ कविता लिहिण्यासाठी का एवढा ताण सहन करायचा

आता पदा-पुरस्कारासाठी लिहिली जातेय कविता
हा मूग गिळून बसणारा समाज काय देणार एखाद्या कवीला
त्याला केवळ आस असते अशा कवितांची
ज्या त्याच्या गप्प बसण्याचं गुपित उघड करतील!

## वाईट काळात कविता

अशा वाईट काळात
कशी लिहावी कविता
फुलांकडे पाहून हे म्हणणे कठीण
की ही फुलं आहेत

डोंगरावर चढावं
तर वाळूच्या ढिगाऱ्यासारखे ते कोसळावेत
नदीचं पाणी इतकं विषारी
की बुडी मारली तर चामडी सोलवटून निघावी

चॉकलेटमध्ये गोडीऐवजी
जाहिरातींचा गोंधळ
साबणात सुगंधाऐवजी
प्रचारक नटीची अदा
म्हणजे पहा, कोणतीही गोष्ट अशी नाहीये
जशी ती असायला हवी

खोटेपणाच्या नगाऱ्यावर वाजता वाजता
शब्दांचा गौरव गेलाय हरवून
जेव्हा घडतात एवढ्या
नकोशा घटना एकदम
अशा वाईट काळात
कशी लिहावी एखादी कविता!

अनु.
**भारती गोरे**
औरंगाबाद